# 'करिअर कंपास' विद्यार्थ्यांचे भविष्य घडविणारा ग्रंथ

## मुख्यमंत्री प्रमोद सावंत : डॉ. महादेव गावस यांच्या संकलित ग्रंथाचे प्रकाशन

■ टीम दैनिक हेराल्ड

**पर्वरी, दि. ४ :** गोवा राज्य उच्च शिक्षण परिषदेच्या वतीने प्रकाशित होणाऱ्या 'करिअर कंपास : अ हँडबुक फॉर करिअर, स्कॉलरशिप्स अँड कॉम्पिटेटिव्ह एक्झाम' या ग्रंथामुळे विद्यार्थी सक्षम बनतील. विद्यार्थ्यांना त्यांच्या भविष्याबद्दल माहितीपूर्ण निर्णय घेताना मदत करण्यासाठी 'करिअर कंपास' हा एक महत्त्वाचा स्त्रोत आहे, असे प्रतिपादन राज्याचे मुख्यमंत्री डॉ. प्रमोद सावंत यांनी पर्वरी येथील सचिवालयात केले.

उच्च शिक्षण संचालनालयातील समर्थ ई गव्हर्नन्स प्रोजेक्ट युनिटचे संचालक डॉ. महादेव गावस यांनी संकलित केलेल्या 'करिअर कंपास : अ हँडबुक फॉर करिअर, स्कॉलरशिप्स अँड कॉम्पिटेटिव्ह एक्झाम' या ग्रंथाच्या प्रकाशनानिमित्त मुख्यमंत्री प्रमोद सावंत बोलत होते.

यावेळी राज्याचे शिक्षण सचिव प्रसाद लोलयेकर, उच्च शिक्षण संचालनालयाचे संचालक भूषण सावईकर, ग्रंथाचे लेखक डॉ. महादेव गावस आदी मान्यवर उपस्थित होते.

मुख्यमंत्री डॉ. सावंत म्हणाले की, हा ग्रंथ करिअर मार्गदर्शनातील मैलाचा दगड ठरणार असून तरुणांचे भविष्य घडविण्यासाठी हा ग्रंथ नक्कीच उपयोगी आहे. वास्तव जगातील आव्हानांविरोधात उभे राहण्यासाठीचे बळ विद्यार्थ्यांना नक्कीच करिअर कंपासमधून मिळेल.



पर्वरी : 'करिअर कंपास' या ग्रंथाचे प्रकाशन करताना मुख्यमंत्री डॉ. प्रमोद सावंत. बाजूला शिक्षण सचिव प्रसाद लोलयेकर, संचालक भूषण सावईकर, लेखक डॉ. महादेव गावस व मान्यवर.

**'करिअर कंपास' शिक्षक, विद्यार्थी यांचा साथीदार : डॉ. गावस**

विद्यार्थ्यांसाठी करिअर निवड प्रक्रिया सुलभ व्हावी, या अनुषंगाने संसाधने तयार करणे हे आमचे उद्दिष्ट होते. ते उद्दिष्ट करिअर कंपास या ग्रंथाच्या माध्यमातून साध्य झालेले आहे. करिअर कंपास हा ग्रंथ शिष्यवृत्ती, प्रवेश परीक्षा आणि करिअर मार्गांबद्दल विस्तृत स्वरूपाची माहिती देत असल्यामुळे हा ग्रंथ शिक्षक आणि विद्यार्थी यांचा विश्वासू साथीदार म्हणून काम करेल, अशी प्रतिक्रिया ग्रंथाचे लेखक डॉ. महादेव गावस यांनी दिली.

**१२ वी नंतरचा पहिला करिअर मार्गदर्शन ग्रंथ**

गोव्यात प्रसिद्ध झालेला हा पहिला असा ग्रंथ आहे, जो १२ वी नंतरच्या करिअर संधीवर प्रकाशझोत टाकतो. या ग्रंथामध्ये विविध क्षेत्रातील २००हून अधिक करिअर पर्याय तपशीलवारपणे स्पष्ट केलेले आहेत. हा ग्रंथ माध्यमिक, उच्च माध्यमिक, महाविद्यालये आणि सरकारी ग्रंथालयांमध्ये उपलब्ध असेल.

**आंतरराष्ट्रीय प्रवेश परीक्षा आणि राष्ट्रीय शिष्यवृत्तींचा समावेश**

'करिअर कंपास'मध्ये परदेशात उच्च शिक्षणासाठी आवश्यक असलेल्या आंतरराष्ट्रीय प्रवेश परीक्षांचे विस्तृत संकलन केलेले आहे. या ग्रंथामध्ये एसएटी, जीआरई, जीएमएटी, टीओईएफएल, आयईएलटीएस आणि इतर अनेक परीक्षांसाठी पात्रता निकष, अर्ज प्रक्रिया आणि अंतिम मुदतीबाबत तपशीलवार विवेचन केलेले आहे. या व्यतिरिक्त या ग्रंथात भारतीय विद्यार्थ्यांना उपलब्ध असणाऱ्या राष्ट्रीय शिष्यवृत्तींची विस्तृत यादी दिलेली आहे.

पान १ वरून

## वाहतूक नियम अंमलबजावणीसाठी नवे धोरण

करण्यासाठी आणि भ्रष्टाचाराला आळा घालण्यासाठी हा निर्णय घेण्यात आला आहे. अनेक वाहनचालकांनी पोलिसांवर विनाकारण अडवून दंड मागण्याचे आरोप केले होते. त्यामुळे हा नवीन निर्णय लागू करून, वाहनचालक आणि पर्यटकांचा गैरसोय टाळण्याचा प्रयत्न करण्यात आला आहे.

---

## चार जवान शहीद, दोन अतिरेकी ठार

दिसून येत आहे. गेल्या काही वर्षांत डझनभर सुरक्षा जवान, नागरिक आणि पोलीस अधिकारी दहशतवादी हल्ल्यांत शहीद झाले आहेत.
दहशतवाद पोर्टलच्या अहवालानुसार, २०२१ मध्ये जम्मू-काश्मीरमध्ये १५३ दहशतवादी घटनांची नोंद झाली होती, तर २०२४ मध्ये हा आकडा ६१ पर्यंत खाली आला आहे. मात्र, कठुआ जिल्ह्यातील अलीकडील घटनांमुळे सुरक्षा यंत्रणांना सतर्क करण्यात आले आहे.
या हल्ल्यांमागे पाकिस्तानचा हात असल्याचा आरोप जम्मू-काश्मीर पोलिसांनी केला आहे. कठुआ जिल्ह्यात यापूर्वीही अनेक दहशतवादी कारवाया झाल्या आहेत. २०२४ मध्ये कठुआमधील एका गावात झालेल्या हल्ल्यात एक नागरिक आणि एक जवान शहीद झाला होता, तर लष्कराच्या तुकडीवरही हल्ला करण्यात आला होता. ३१ मार्च रोजी सुरक्षा दल आणि अतिरेक्यांमध्ये पुन्हा एकदा चकमक झाली, त्यानंतर संपूर्ण परिसर वेढण्यात आला आहे. या मोहिमेत जम्मू-काश्मीर पोलिसांचे विशेष पथक, भारतीय लष्कर आणि सीआरपीएफ च्या तुकड्यांचा सहभाग असून, अतिरेक्यांचा पूर्णपणे निःपात करण्यासाठी सुरक्षा दलांचे प्रयत्न सुरू आहेत.

---

## लाचखोर तलाठ्याला दिली सक्तीची निवृत्ती

शक्यता आहे. दक्षिण गोव्यातील या कठोर निर्णयामुळे सरकारी यंत्रणांमध्ये प्रामाणिकपणा आणि पारदर्शकता प्रस्थापित करण्याच्या प्रयत्नांना बळ मिळेल तसेच भ्रष्टाचाराला आळा घालण्याच्या दृष्टीने हा एक महत्त्वाचा टप्पा ठरेल.

**NOTICE**

My Husband **Late Chacko Varghese** was owning **Hyundai I10 Sports Car** bearing **Reg. No. GA-06-D-8785 & Honda Activa SCV110B Scooter** bearing **Reg. No. GA-06-J-1245.** After his death, I have applied to transfer the ownership into my name. Any member of the public, or any other Institution/ Bank objecting for such transfer, may send their objections along with documentary proof, to the **RTO, Vasco** or to me **within 15 days** time from today.

Date: 4.4.2025

Sd/- **Smt. Alice Varghese**
H. No. 976/5, Zari, Zuarinagar, Sancaole, South Goa 403726.

Sandeep Ads

**CHANGE IN NAME**

I **Ana Lita Ferrao** H. No 27 St Francis Vaddo Sant Estevam Tiswadi Goa would like to correct my name from **Ana Lita Fernandes** to **Ana Lita Ferrao** herein after in all my dealings and documents I will be known by my new name **Ana Lita Ferrao.**

**CHANGE IN NAME**

I **Mulam Yacub** H. No B-2/104 Deeraj Laxmi bldg Aquem Alto Margao Goa would like to correct my name from **Mulam Yacub Mulam Usman** to **Mulam Yacub** herein after in all my dealings and documents I will be known by my new name **Mulam Yacub.**

**Change in Name**

I, **Mrs. Bhavi Laximicanta Morcoicar**,
R/o H. NO. 173, Padriguelem, Sernabatim, Colva, South, Goa, Pin: 403708,
has changed my name from
**Vinodini Atmarama Chornecar**,
to
**Bhavi Laximicanta Morcoicar**.
Hereafter in all my dealings & documents, I will be known by my name
**Bhavi Laximicanta Morcoicar**
Sd/-
Bhavi Laximicanta Morcoicar

**OFFICE OF THE CIVIL REGISTRAR CUM SUB REGISTRAR AND SPECIAL NOTARY (EX-OFFICIO) OF BARDEZ JUDICIAL DIVISION AT MAPUSA, GOA**

NO. CRSR / BARDEZ / NOT / 747 / 2025 Dated 04/04/2025

**NOTICE**

Mrs. Malini Sawant, Joint Civil Registrar cum Sub Registrar II and Special Notary Ex-Officio of Bardez Judicial Division at Mapusa, Goa
In accordance with Sec. 346 (11) of the Goa Succession Special Notaries and Inventory Proceeding Act, 2012, it is hereby made public that by a Notarial Deed of Succession dated 21/03/2025 drawn by and before me Mrs. Malini Sawant, Joint Civil Registrar Cum Sub Registrar II and Special Notary Ex-Officio Bardez at Mapusa at Page 65 onwards in the Notarial Book No. 889 of this Office the following is recorded:
That on 08.04.2018 expired Mrs. Mahananda Ramnath Bhosle alias Mahananda Bhonsle alias Essu Loximona Alornacar alias Mahananda Ramnath Bhosle Corjuencar at Modlowado, Morjim, Pernem, Goa and on 06.05.2021 expired Mr. Ramnath Shamba Bhosle alias Ramnath Xamba Bhosle alias Ramnath Bhonsle alias Ramanata Xamba Corjuencar alias Ramnath Shamba Bhosle alias Ramanata Xamba Corjuencar alias Ramnath Shamba Bhosle at H.No. 606, Guddem, Siolim, Bardez, Goa without leaving behind any Will or any other disposition of their assets, however leaving behind following children as their only and universal heirs 1) Shri. Shailesh Ramnath Bhosle, aged 49 years, unmarried, (2) Shri. Sachin Ramnath Bhosle, aged 47 years, unmarried, (3) Shri. Prasad Ramnath Bhonsle, aged 41 years married to Mrs. Anak Anung Anik Febriana, all residents of H.No. 606, Guddem, Siolim, Bardez, Goa and (4) Mrs. Tripati Ramnath Bhosle alias Pradniya Paresh Naik, aged 40 years, married to Shri. Paresh Mahableshwar Naik, both residents Guddem, Siolim, Bardez, Goa, who can concur to the estate left behind by them up their death. That the said aforesaid persons are the sole and universal heirs a successors of the said deceased and besides them there are no other person persons who according to law may concur along with them to the estate left by aforesaid deceased persons.
Any person having objection to this deed may file in this Office within 30 days from the date of its publication.

Seal

Sd/- **Malini Sawant**
Special Notary (Ex-Officio)
Bardez, Mapusa, Goa

**IN THE OFFICE OF THE INSPECTOR OF SURVEY & LAND RECORDS, PONDA-GOA**

**Case No. ISLR/DEM/PON/CAND/46/24**

The Assistant Engineer, Sub-Div. II, W.D.III, W.R.D., Ponda- Goa ...**Applicant**

V/S

1. Santosh Pandurang Gaonkar, R/o. H.No9/17/8(1) Parizata Bldg. Khadpabandh Ponda Goa 2. Gopalkrishna Vinayak Gaonkar, R/o. Opa Khandepar Ponda Goa. 3. Deu Subha Gaude, R/o. Charpar Ghotmod Opposite PWD Opa Khandepar, Usgao, Ponda Goa. 4. Saju Subha Gaude, R/o. Charpar Ghotmod Opposite PWD Opa Khandepar, Usgao, Ponda Goa. 5. Ashok D Gaonkar, R/o Near Pascol Farm Ghotmod Usgao, Ponda Goa. 6. Milagres Fernandes, R/o Pascol Farm Ghotmod Usgao Ponda Goa. 7. The Executive Engineer, WD-III, WRD., R/o. 4th Floor Govt. office, Complex Tisk, Ponda Goa ...**Respondents**

**PUBLIC NOTICE**

Whereas, the above named applicant has moved an application to this Court for Demarcation of HIS/HER/THEIR/ITS share under section 114 of Land **Revenue Code 1968 in respect of property surveyed under Survey No. 152/2-A of Candepar & 268/1-A of Village Usgao of Ponda-Goa.**

AND WHEREAS, applicant served the notices through Registered A.D to the adjoining holders.

AND WHEREAS, notices are returned back from the postal authority with the endorsement "Insufficient Address, Not known", etc.

AND WHEREAS, the applicant has made an application on 24/03/2025 and prayed for service of summons by issuing Public Notice in any local daily under order V Rule (20(1-A) of Civil Procedure Code, 1908 as the applicant has stated his inability to submit the detailed addresses of the above respondents and their legal heirs.

AND WHEREAS, I am satisfied that this is a fit case for grant of such publication.

NOW THEREFORE, notice is hereby given to the applicant who thereby shall remain present in the office of Inspector of Survey and Land Records, Ponda Goa at **10:00 A.M.** on **08/05/2025** in order to proceed to the site along with the Field Surveyors **Shri. Chetan Shirvoikar.** The respondents/adjoining land holders are requested to remain present at site on scheduled date i.e. on **08/05/2025 at 10:30 A.M.** onwards.

The applicant is further requested to clear the bushes on the boundary line, if it has not been done so far, and arrange two labourers at site for helping the Surveyor for measurement work at the time of survey.

After completion of survey work your say will be recorded in the inspection report.

**You are further directed to remain present before this Court on 30/05/2025 @ 10.30 a.m. and give your say in the matter if any, failing which the case will be heard and decided in your absence.**

Given under my hand seal of this Court on this 04th day of April, 2025.

Sd/- **(Rajesh R. Pai Kuchelkar)**
Inspector of Survey & Land Records,
Ponda Goa

# धेंपे उच्च माध्यमिकची यशाची परंपरा कायम

## बारावीच्या परीक्षेत विद्यार्थ्यांचे घवघवीत यश



■ टीम दैनिक हेराल्ड

**पणजी, दि. ४ :** गोवा माध्यमिक आणि उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाच्या बारावी परीक्षेत कुजिरा येथील वसंतराव धेंपो उच्च माध्यमिक विद्यालयाने कला, विज्ञान आणि वाणिज्य या तिन्ही शाखांमध्ये घवघवीत यश संपादन केले. कला शाखेचा निकाल ९७ टक्के लागला असून वाणिज्य शाखेचा ९६.०८ टक्के तर विज्ञान शाखेचा निकाल ९४ टक्के इतका लागला आहे. एकंदरीत उच्च माध्यमिक विद्यालयाच्या निकालाचे सरासरी प्रमाण ९६ टक्के इतके आहे.

कला शाखेत एकूण ६६ विद्यार्थी बसले होते. त्यापैकी २१ विद्यार्थ्यांनी विशेष आणि २२ विद्यार्थ्यांनी प्रथम श्रेणी मिळवली आहे. वाणिज्य शाखेत एकूण १७९ विद्यार्थी बसले होते, त्यापैकी २१ विद्यार्थ्यांनी विशेष आणि ५३ विद्यार्थ्यांनी प्रथम श्रेणी मिळवली आहे. विज्ञान शाखेत उत्तीर्ण होण्याचे प्रमाण ९४ टक्के असून एकूण १७३ विद्यार्थी बसले होते. त्यापैकी १६ विद्यार्थ्यांनी विशेष आणि ७७ विद्यार्थ्यांनी प्रथम श्रेणी मिळवली आहे. या धेंपो उच्च माध्यमिक विद्यालयाचे व्यवस्थापक राजेश भाटीकर, प्राचार्या मीनाक्षी मुदलियार, उपप्राचार्या माया सरदेसाई, पालक-शिक्षक संघ तसेच शिक्षकांनी यशस्वी विद्यार्थ्यांचे अभिनंदन केलेले आहे.

**कला शाखेत सान्वी नाईक प्रथम**

कला शाखेत सान्वी विलास नाईक हिने ६०० पैकी ५६५ गुण मिळवून ९४.१७% टक्के गुण प्राप्त करत प्रथम येण्याचा मान पटकावला. टूलिप परेरा याने ६०० पैकी ५६४ गुण मिळवून ९४ टक्के प्राप्त करत दुसरा क्रमांक पटकावला. तर सिया के. साळगावकर हिने ६०० पैकी ५६१ गुण मिळवून ९३.५ टक्के प्राप्त करत तिसरा क्रमांक पटकावला.

कला शाखेत रीधीमा वेंगुर्लेकर, टूलिप परेरा, सिया साळगावकर, ईशिता जोशी, तियारा परमार, रोल डिसिल्वा, सान्वी नाईक आणि अनुज कुमार यांना राज्यशास्त्रात १००पैकी १०० गुण मिळाले. तसेच इतिहासात रीधीमा वेंगुर्लेकर आणि टूलिप परेरा यांना १००पैकी १०० गुण मिळाले.

**वाणिज्य शाखेत निकोल द कोस्टाची बाजी**

वाणिज्य शाखेत निकोल दा कोस्टा हिने ६०० पैकी ५६८ गुण प्राप्त करत ९४.६७ टक्के मिळवून प्रथम आली. विद्या उदय भट ६०० पैकी ५६२ गुण प्राप्त करत ९३.६७ टक्के मिळवून द्वितीय आली. तर अभिनव आनंद आचार्य ६०० पैकी ५३६ गुण प्राप्त करत ८९.३३ टक्के मिळवून तृतीय आला.

वाणिज्य शाखेत निकोल दा कोस्टा हिला अकाउंटन्सी या विषयात १००पैकी १०० गुण मिळाले.

**विज्ञान शाखेत स्वप्नील पाटील प्रथम**

विज्ञान शाखेत स्वप्नील पाटील ६०० पैकी ५५४ गुणांसह ९२.३३ टक्के प्राप्त करत प्रथम आला. तनक संतोष बाळे ६०० पैकी ५१० गुणांसह ८५ टक्के गुण मिळवून द्वितीय आला तर ट्रेला वेल्स ६०० पैकी ५०४ गुण मिळवून ८४टक्के प्राप्त करत तिसरी आली



# पेठेच्या जत्रेस उत्साहात प्रारंभ ; भाविकांची मोठी गर्दी

■ टीम दैनिक हेराल्ड

**डिचोली, दि. ४ :** मुळगावचे ग्रामदैवत श्री देवी केळबाईची प्रसिद्ध पेठेची जत्रेला मंगलमय वातावरणात सुरुवात झाली. सकाळपासून भाविकांनी गर्दी केली होती. दुपारी व्रतस्थ धोंडांनी देवीच्या तळीत पवित्र स्नान करून देवदर्शन घेतले.

यानिमित्त सकाळपासून धार्मिक विधी संपन्न झाले. रात्री देवीची पेठ अबोलीची फुले व इतर फुलांनी सजवण्यात आली. त्यानंतर देवीचा जयजयकार करीत पेठ डोक्यावर घेऊन धोंडांनी नृत्य केले. तद्नंतर देवी व्हाळशी, बोर्डे डिचोली मार्गे मये येथे आपल्या बहिणीच्या भेटीसाठी प्रस्थान केले. मये येथे पहाटे देवीचे स्वागत करण्यात आले. सोमवार, दि. ७ रोजी सकाळी दहा वाजल्यापासून कौलोत्सवास सुरुवात होणार आहे. रात्री दहा वाजता अमृतनाथ पारंपरिक दशावतार नाट्यमंडळ निर्मित 'कुर्मदासाची वारी' हे दशावतारी नाटक होईल.

तसेच दि. ११ एप्रिलपर्यंत रोज रात्री नाटके सादर होतील. पाचव्या दिवशी देवीचे मंदिरात आगमन झाल्यानंतर उत्सवाची सांगता होणार आहे.

# साखळीत १८ पासून निवासी कीर्तन प्रशिक्षण शिबिर

■ टीम दैनिक हेराल्ड

**साखळी, दि. ४ :** गोमंतक संत मंडळ, फोंडा आणि सम्राट क्लब, साखळी यांच्या संयुक्त विद्यमाने शिवस्मृती खेडेकर हॉल साखळी येथे निवासी कीर्तन संस्कार प्रशिक्षण शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे. सदर निवासी कीर्तन संस्कार प्रशिक्षण शिबिर दि.१८ रोजी संध्याकाळी ४ वाजता सुरु होऊन दि. २० रोजी संध्याकाळी ६ वा. समारोप होईल. या शिबिरात कीर्तन संस्कार, योग, संस्कृत, अभिनय, धर्मशिक्षण दिंडी, प्रभातफेरी, आरती, स्तोत्रे, गोंधळ, जोगवा, नामस्मरण आदी शिकवले जाईल.

**VILLAGE PANCHAYAT ST. ANDRE TISWADI-GOA**
TEL No. 8793867251 Email: standre@rediffmail.com

**TENDER NOTICE**
**(E-TENDERING & E-PAYMENT MODE ONLY)**

**Ref. No: VP/SA/Tis/2024-2025/1045** **Date: 21.03.2025**

**TENDER NOTICE**
**(E-Tendering mode only)**

The Sarpanch Village Panchayat St. Andre (Goa Velha), Tiswadi-Goa, invites on behalf of Governor of Goa, online Percentage Rate tenders from eligible Contractors of state PWD Goa, registered in appropriate class and categories for the following work:-
1. Construction of shed for fish market in the premises of Village Panchayat Goa Velha, V.P. St. Andre Goa Velha, Tiswadi - Goa (under Panchayat funds)
- The last date of online application submission of tender is **15/4/25 up to 12:00 noon.**
- Tender online will be opened at 12:00 noon hrs on **17/04/2025** in the office of the V. P. St. Andre (Goa Velha), Tiswadi, Goa.

For all participation & other details visit on e-tendering website https://eprocure.goa.gov.in or V.P. St.Andre (Goa Velha) Office.

**(ANDRE E. PEREIRA)**
V. P. SARPANCH
V. P. St. Andre (Goa Velha) TISWADI GOA.

# माऊली देवस्थानचा मूर्ती पुन:प्रतिष्ठापना सोहळा सोमवारपासून

■ टीम दैनिक हेराल्ड

**पेडणे, दि. ४ :** पेडणे तालुक्यातील उगवे येथील श्री देवी माऊली देवस्थानचा मूर्ती पुनःप्रतिष्ठापना सोहळा दि. १२ ते १४ एप्रिल असा तीन दिवस थाटात साजरा करण्यात येणार आहे. यानिमित्त माऊली मंदिरात विविध धार्मिक विधी आणि सांस्कृतिक कार्यक्रमांसह आयोजित करण्यात येणार आहे. यानिमित्त शनिवार, दि. १२ रोजी सकाळपासून माऊली मंदिरात धार्मिक विधी आयोजित करण्यात येणार आहेत. सकाळी ८ वा. प्रायश्चित्त विधी, देवता प्रार्थना संकल्प, गणपती पूजन, स्वस्तिक पुण्याह वाचन, मातृका पूजन, दावनांदिश्राद्ध, आचार्यादिऋग्त्विक प्राकारशुद्धी, गंगा पूजन, गणेश याग, अतुत होम, शांती होम, मंडप प्रतिष्ठा वरण, शांतीपाठ, रात्री ९ वा. स्वर सुमनांजली हा गायनाचा कार्यक्रम होईल. गायक - महेश सारमंडळी ( मुंबई ) यांचे गायन असून त्यांना तबला - रोहिदास परब, संवादिनी - सुभाष फातर्पेकर, पखवाज - मनिष तांबोस्कर, तबला - सात्विक नाईक साथसंगत करणार आहेत. तर सूत्रनिवेदन परेश नाईक करणार आहेत. दि. १३ रोजी सकाळी ८ वा. स्थल शुद्धी, देवता स्नान विधी, शय्याधिवास योगिनी आवाहन पूजा, वास्तु मंडल आवाहन पूजा, भैरव आवाहन पूजा, वास्तु मंडल आवाहन पूजा, भैरव आवाहन पूजा, अग्नि आवाहन ग्रह आवाहन पूजा, वास्तुयाग, ग्रहयाग, प्रधान पर्याय होम, तत्वहोम, शांतीपाठ व त्यानंतर शिखर कलश स्थापना होईल. रात्री ९ वा. कीर्तन मंजिरी ह. भ. पं. संध्याजी संतोष पाठक पोतदार (सांगली - हरीपूर) यांचे सुश्राव्य कीर्तन होईल. नारदीय कीर्तनकार, प्रवचनकार, व्याख्याते, कथाकार, श्रीमद् भागवत, श्रीमद् देवी भागवत, श्रीमद् रामकथा, शिवपुराण. ऑर्गन - शिवानंद दाभोलकर व तबला - दत्ताराज नाईक. आयोजक गोविंद पुंडलिक महाले. दि. १४ रोजी प्राकारशुद्धी देवता मधुपर्क पूजा होईल. त्यानंतर १० वाजून ३ मिनिटांच्या शुभ मुहूर्तावर श्री माऊली देवता प्रतिष्ठापना होईल. तद्नंतर तत्वन्यास प्राणवप्रतिष्ठा महापूजा, बलिदान, पूर्णाहुती, महानैवेद्य, आरती, मंत्रपुष्प, सार्वजनिक गाऱ्हाणे, आशीर्वाद, तीर्थप्रसाद व महाप्रसाद होईल. दुपारी ३.३० वा. सत्यनारायण महापूजा होईल. रात्री १० वा. नाट्य साधना उगवे निर्मित कै. विष्णू वाघ लिखित आणि निलेश महाले दिग्दर्शित महान दोन अंकी नाटक अलख निरंजन सादर करण्यात येईल. वेदमूर्ती अनंत महादेव गाडगीळ यांच्या अधिपत्याखाली आणि वेदमूर्ती अजित वाटवे, वेदमुर्ती श्रीनिवास गजानन मराठे, पुरोहित गजानन महाबळ व श्याम वझे यांच्या सहकार्यातून हा प्रतिष्ठापना सोहळा संपन्न होणार आहे.

**State Bank of India**

**शाखा-एसएआरबी ठाणे (११६९७) शाखा :**
स्ट्रेस्ड असेट्स रिकव्हरी शाखा, 1 ला मजला, प्लॉट क्र. ए-112, सर्कल रोड क्र. 22, वागळे औद्योगिक वसाहत, ठाणे (पश्चिम) 400604. शाखेची ईमेल आयडी : sbi.11697@sbi.co.in

**स्थावर मालमत्तांच्या विक्रीसाठी विक्री सूचना । परिशिष्ट-4 ए (नियम 8(6) च्या तरतुदी पहा)**

**सिक्युरिटायझेशन अँड रिकन्स्ट्रक्शन ऑफ फायनान्शियल असेट्स अँड एन्फोर्समेंट ऑफ सिक्युरिटी इंटरेस्ट अ‍ॅक्ट, 2002 सह सिक्युरिटी इंटरेस्ट (एन्फोर्समेंट) रूल्स, 2002 च्या नियम 8(6) मधील तरतुदींखाली स्थावर मालमत्तांच्या विक्रीसाठी ई-लिलाव विक्री सूचना**

याद्वारे तमाम लोक आणि खासकरून कर्जदार व हमीदार यांना नोटीस देण्यात येते की, सुरक्षित धनकोकडे गहाण टाकलेल्या व त्यांचा भार असलेल्या खाली वर्णिलेल्या स्थावर मालमत्ता ज्यांचा भौतिक ताबा **स्टेट बँक ऑफ इंडियाच्या, सुरक्षित धनकोच्या** प्राधिकृत अधिकारी यांनी घेतला असून त्या श्री. इब्राहिम मुनीर नूर यांचेकडून सुरक्षित धनकोस दि. **06.04.2023** रोजी देय असलेल्या रु. **80,17,592/- (रु. ऐंशी लाख सतरा हजार पाचशे ब्याण्णव फक्त)** अधिक त्यापुढील व्याज, नैमित्तिक खर्च व किमती यांसहितच्या रकमेची वसुली करण्याकरिता **जसे आहे जेथे आहे, जे आहे जे काही आहे,** व **तेथे जे जे काही आहे** या तत्वावर **30.04.2025** रोजी विकल्या जातील. राखीव किंमत **रु. 60,26,000/- (रु. साठ लाख सव्वीस हजार फक्त)** राहील आणि बयाणा रक्कम ठेव रु. **6,02,600/- (रु. सहा लाख दोन हजार सहाशे फक्त)** राहील.

इच्छुक बोलीदारांनी त्यांच्या बोली सादर करण्यापूर्वी लिलावात काढलेल्या मालमत्तेची मालकी, त्यावरील भार व मालमत्तेवर परिणाम करणारे दावे/हक्क/सोसायटी/बिल्डर यांना देय रकमा यांची त्यांची स्वतःची स्वतंत्र चौकशी करावी. यासंबंधी, ई-लिलाव जाहिरात कोणतीही वचनबद्धता किंवा बँकेचे कोणतेही प्रतिनिधित्व समाविष्ट करीत नाही व समाविष्ट केल्याचे मानले जात नाही.

बोलीदारांनी आवश्यक केवायसी दस्तावेज पुरवून **(https://baanknet.com)** यावर त्यांना स्वतःला नोंदणीकृत करून घ्यावे आणि लिलाव तारखेच्या बऱ्याच आधी **मे. पीएसबी अलायन्स प्रायव्हेट लिमिटेड** यांद्वारे अवलंबिलेल्या पद्धतीनुसार नोंदणी शुल्काचा भरणा करावा.

**जाहीर ई-लिलाव तारीख व वेळ : 30.04.2025** दुपारी **1.00 ते 3.00 (प्रत्येकी 10 मिनिटांच्या अमर्यादित विस्तारासह)**

| मालमत्ता तपशील/मालमत्ता आयडी क्र. | राखीव किंमत (रु.) | बयाणा रक्कम ठेव (रु.) | बोली वाढ किंमत (रु.) | पाहणीची तारीख व वेळ |
|---|---|---|---|---|
| **श्री. इब्राहिम मुनीर नूर** यांच्या नावे असलेल्या सांकवाळ गाव, मुरगाव, गोवा-403710 च्या सर्व्हे क्र. 178/3 व 4 असलेल्या कोटांबे किंवा अप्रामेंतो कोटोंब वा कुटुंब या नावाने ओळखल्या जाणाऱ्या मोठ्या मालमत्तेचा भाग असलेल्या सांकवाळ गावाच्या सर्व्हे क्र. 178/3 मधील प्लॉट ए वर बांधलेल्या दी बीच व्हिलेज या नावाच्या सदर कॉम्प्लेक्सच्या ए-1 टॉवरमधील जिना व लाईफ अशा सामाईक भागासह 153.34 चौ.मी. सुपर बिल्ट अप क्षेत्रफळ असलेला टॉवर ए-1 मधील ३ ऱ्या मजल्यावरील फ्लॅट क्र. ए-1-304. **मालमत्ता आयडी क्र. : एसबीआयएन 200029456574** | 60,26,000.00 | 6,02,600.00 | 1,00,000.00 | 25.04.2025 सकाळी 11.00 ते दुपारी 1.00 |

विक्रीच्या तपशीलवार अटी व शर्तींसाठी सुरक्षित धनको म्हणजे स्टेट बँक ऑफ इंडियाच्या **www.sbi.co.in, https://sbi.co.in/web/sbi-in-the-news/auction-notices/sarfaesi-and-others** आणि **https://baanknet.co**I या संकेतस्थळावर पुरविलेल्या लिंकचा संदर्भ घ्यावा किंवा चंद्रकुमार डी. कांबळे, सीएलओ मोबा. क्र. **7875551566** व **श्री. अमित एम. साठे, सी ओ मोबा. क्र. 9834937001 यांना संपर्क करावा.**

**दिनांक : 03.04.2025**
**ठिकाण : ठाणे**

**सही/-**
**चंद्रकुमार डी. कांबळे**
**प्राधिकृत अधिकारी, स्टेट बँक ऑफ इंडिया**

# जिद्दीने अभ्यास केल्यास यश निश्चित..!

## दिनार म्हार्दोळकर : अंबिये महाविद्यालयात ब्लू क्रॉस लॅबोरेटरीज शिष्यवृत्ती प्रदान सोहळा

■ टीम दैनिक हेराल्ड

**पेडणे, दि. ४ :** विद्यार्थ्यांनी त्यांच्या शैक्षणिक प्रवासात चिकाटीने अभ्यास केल्यास यश निश्चितपणे प्राप्त होते, असे प्रतिपादन दिनार म्हार्दोळकर यांनी केले.

संत सोहिरोबानाथ आंबिये कला आणि वाणिज्य शासकीय महाविद्यालयात आयोजित केलेल्या ब्लू क्रॉस लॅबोरेटरीज शिष्यवृत्ती प्रदान सोहळ्यात प्रमुख पाहुणे म्हणून ते बोलत होते. यावेळी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ जुवांव कोस्टा आणि संयोजक प्रा. आनंद कोळंबकर उपस्थित होते.



पेडणे: शिष्यवृत्ती प्राप्त विद्यार्थ्यांसोबत प्रमुख पाहुणे दिनार म्हार्दोळकर, प्राचार्य जुवांव कोस्टा आणि संयोजक प्रा. आनंद कोळंबकर

संत सोहिरोबानाथ अंबिये शासकीय कला आणि वाणिज्य महाविद्यालयातील परिसंवाद सभागृहात ब्लू क्रॉस लॅबोरेटरीज शिष्यवृत्ती वितरण समारंभ यशस्वीरित्या पार पडला. या सोहळ्यात शैक्षणिक उत्कृष्टता आणि समर्पणाची दखल घेत विविध वर्गातील १८ पात्र विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती पुरस्कार प्रदान करण्यात आले. शिष्यवृत्ती समितीचे संयोजक प्रा. आनंद कोळंबकर यांनी शिष्यवृत्ती वितरण समारंभाचे संयोजन केले.

महाविद्यालय सर्व शिष्यवृत्ती प्राप्तकर्त्यांचे मनापासून अभिनंदन करते आणि त्यांना त्यांच्या शैक्षणिक आणि व्यावसायिक प्रयत्नांमध्ये सतत यश मिळावे अशी प्रार्थना करतो, असे मनोगतात प्राचार्य डॉ जुवांव कोस्टा यांनी सांगितले. यावेळी प्राचार्य डॉ जुवांव कोस्टा यांनी शिष्यवृत्ती प्राप्तकर्त्यांचे अभिनंदन केले आणि त्यांना शैक्षणिक उत्कृष्टतेसाठी वचनबद्ध राहण्यासाठी प्रोत्साहित केले.